कोकण पाटबंधारे विकास महामंडळावर उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्याबाबत.
श्री. विक्रांत दत्ताजीराव आंबरे, जिल्हा-रत्नागिरी

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक - नियुक्ती -२०१९/व्ही-६/प्र.क्र.७६/२०१९/जसंनि
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०९ /०८/२०१९

प्रस्तावना -

राज्यामध्ये सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम - १९९७ मधील तरतुदीनुसार कोकण पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. सदरहू अधिनियम दि. ०४ डिसेंबर, १९९७ रोजी अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ४ (१)(ब) नुसार महामंडळाच्या रचनेमध्ये राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे एक अशासकीय सदस्य उपाध्यक्ष पदी नेमणूक करण्याची तरतूद आहे. त्यानंतर कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अधिनियम, २००१ दि. २४/०८/२००० अमंलात आला आहे. या सुधारणा अधिनियमातील कलम ४ (१)(ब) नुसार महामंडळाच्या रचनेमध्ये राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे कोकण प्रदेशातील दोन अशासकीय सदस्य उपाध्यक्ष पदी नेमणूक करण्याची तरतूद आहे.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे या महामंडळावर उपाध्यक्ष पदी राज्य शासनाने नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यामध्ये सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम - १९९७ मधील तरतुदीनुसार कोकण पाटबंधारे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अधिनियम, २००१ दि. २४/०८/२००० अमंलात आला आहे. या सुधारणा अधिनियमातील कलम ४ (१) (ब) नुसार तरतुदीनुसार श्री. विक्रांत दत्ताजीराव आंबरे , मु.पो. गुणदे,कापवाडी, तालुका-खेड, जिल्हा-रत्नागिरी ह्यांची कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे या महामंडळावर उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात येत आहे. अधिनियमातील कलम ४ (२) नुसार त्यांच्या नियुक्तीचा पदावधी शासनाने तत्पूर्वी समाप्त केला नाही तर, एक वर्षाचा असेल .

सदर उपाध्यक्षांना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक शासाऊ १०.१०/प्र.क्र. ९६/१०/साऊ, दि. १३/०३/२०१२ अन्वये विहीत केलेल्या सेवा सुविधा अनुज्ञेय राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८०९१६१७३८०९२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2019.08.09 16:22:09 +05'30'

(र. रा. शुक्ला)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१.मा. राज्यपालांचे सचिव.

२.मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३.मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई-३२.

४.मा. राज्यमंत्री, जलसंपदा , मंत्रालय, मुंबई-३२.

५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई- ३२.

६. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२

७. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

९. प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१०. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

१२ श्री. विक्रांत दत्ताजीराव आंबरे, मु.पो. गुणदे,कापवाडी, तालुका-खेड, जिल्हा-रत्नागिरी.

१३. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.

त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त व्यक्तींनी आपल्या महामंडळाच्या उपाध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकार केल्याचा दिनांक शासनास तात्काळ अवगत करावा.

१४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

१५.कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.

१६.कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

१७.कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.

१८.जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता व सहसचिव मंत्रालय, मुंबई-३२.

१९. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.

२०. जलसंपदा विभागातील सर्व प्रादेशिक मुख्य अभियंते.

२१ महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) , नाशिक.

२२. महासंचालक, महाराष्ट्र जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.

२३. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान , नाशिक.

२४. सर्व अधीक्षक अभियंता व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२५.महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.

२६.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.

२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.

२८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर.

२९. कार्यासन (जसंनि) संग्रहार्थ.